सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.**
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No. 1348/पोउआ/प्रकटीकरण /2023 दिनांक/Date : 03/11/2023

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month August – 2023 ‘‘उत्कृष्ट गुन्हे शोध’’ व Best Conviction of the Month August – 2023 ‘‘उत्कृष्ट अपराधसिध्दी’’ पोलीस नोटीस मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे ऑगस्ट –२०२३ करीता ‘‘ **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिघ्दी)** ’’ याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे ऑगस्ट – २०२३ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ**

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–१० मुंबई. गु.प्र.शा, गु.र.क्र. ४१/२०२३, कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३८५, १२० (ब) सह कलम २३, २४ एन.डी.पी.एस. कायदा १९८५, (वाकोला पोलीस ठाणे गु.र.क्र. ३३०/२३)

**ब) माहे ऑगस्ट – २०२३ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

ट्रॉम्बे पोलीस ठाणे, परिमंडळ – ०६ मुंबई गु.र.क्र १०७/१८ कलम ३५४, ३७६ भा.द.वि सह ४, ६, ८, १० बाल लैंगिक अत्याचार अधि. २०१२

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिघ्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),**
**गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.**

टिप– वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, कक्ष १०, गुप्रशा, गुअवि, मुंबई Best Detection of the Month August– २०२३ या करीता तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई यांना Best Conviction of the August– २०२३ या करीता निवड झाल्यामुळे कळविण्यात येते की, सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र ‘क’ प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच प्रपत्रात नमुद गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

समितीने निवड केलेला गुन्हा हा राज्य पातळीवर निवडीकरीता राज्य गुन्हे अन्वेषन विभाग, पुणे यांना पाठविण्याकरीता आपला अहवाल तात्काळ सर्व निकषांची पुर्तता करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुप्रशा, गुअवि, मुंबई यांचे कार्यालयात लवकरात लवकर सादर करावा जेणेकरून बृहन्मुंबई पोलीस दलाकडून प्रस्ताव सादर करण्यास विलंब होणार नाही. सदरबाबत सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी व योग्य ती कार्यवाही करावी.

**मजकुर :—**

दिनांक २५/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे ऑगस्ट —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट —२०२३

| | | |
|---|---|---|
| ०१ | **गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—१० मुंबई** | **गु.प्र.शा, गु.अ.वि, गु.र.क्र. ४१/२०२३,कलम ४२०, ४६५,४६८,४७१,३८५,१२०(ब) सह कलम २३, २४ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ ( वाकोला पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३३०/२३)** |

### "परदेशात ड्रग निर्यातच्या खोटया केसमध्ये अडकवुन खंडणीची मागणी"

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात आरोपी अॅन्थोनी अॅलेक्स पॉल, वय ३४ वर्षे, याने फिर्यादी श्रीमती प्रमिला परेरा व ईतर बळीत लोकांसोबत झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात ठेवून फिर्यादी यांची मुलगी क्रिसॅन परेरा, बळीत साक्षीदार रुषीकेश पांडया, केन रॉड्रीग्स, क्लेटन रॉड्रीग्स, आणि श्रीमती मोनिषा डिमेलो यांना शारजा पोलीसांकडून ड्रग निर्यातच्या खोटया केसमध्ये अडकवण्यासाठी साथीदार राजेश दामोर बोभाटे रवी उर्फ प्रसाद राव, वय ४२ वर्षे, याचे मदतीने विश्वास संपादन करुन त्यांना त्यांचे संबंधीत नोकरी, क्षेत्र व व्यवसायाचे आमिष दाखवून शारजा येथे जाण्यास भाग पाडून कोणतीही नोकरी अगर व्यवसाय न देऊन त्यांची फसवणुक केली.

तसेच ते परत येऊ नये यासाठी त्यांना परतीचे खोटे व बनावट विमानाचे तिकीट काढून दिले. तसेच शारजा येथे जाताना त्यांना खोटा बहाणा करुन आरोपी शांतीसिंग घासीसिंग राजपूत, वय २७ वर्षे याचेकडून अंमली पदार्थ प्राप्त करून मोमेंटो (ट्राफी) तसेच केकमधून तो अंमली पदार्थ पाठवून त्याबाबतची माहिती शारजा एअरपोर्ट येथे देवून पिडीत व्यक्तींपैकी क्रिसॅन परेरा व क्लेटन रॉड्रीक्स यांना ड्रग निर्यातच्या खोटया केसमध्ये अडकवून शारजा पोलीसांकडून अटक करवली. तसेच त्यांना नमुद केसमधून सोडविण्याकरीता पिडीत यांचे नातेवाईकांकडे पैशांची खंडणी मागितली.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती प्रमिला मार्क परेरा, ५६ वर्षे |
| बळीत | :— | कुमारी क्रिसान परेरा,२७ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) अॅन्थोनी अॅलेक्स पॉल, वय ३५ वर्षे<br>२) राजेश दामोदर बोभाटे, उर्फ रवी उर्फ प्रसादराव, वय ४२ वर्षे<br>३) शांतिसिंग घासीसिंग राजपुत, वय २८ वर्षे,<br>**आरोपी.अटक दिनांक २५/०४/२०२३** |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात आरोपी अॅन्थोनी अॅलेक्स पॉल, वय ३४ वर्षे, याने फिर्यादी श्रीमती प्रमिला परेरा व ईतर बळीत लोकांसोबत झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात ठेवून फिर्यादी यांची मुलगी क्रिसॅन परेरा, बळीत साक्षीदार रुषीकेश पांडया, केन रॉड्रीग्स, क्लेटन रॉड्रीग्स, आणि श्रीमती मोनिषा डिमेलो यांना शारजा पोलीसांकडून ड्रग निर्यातच्या खोटया केसमध्ये अडकवण्यासाठी साथीदार राजेश दामोर बोभाटे रवी उर्फ प्रसाद राव, वय ४२ वर्षे, याचे मदतीने विश्वास संपादन करुन त्यांना त्यांचे संबंधीत नोकरी, क्षेत्र व व्यवसायाचे आमिष दाखवून शारजा येथे जाण्यास भाग पाडून कोणतीही नोकरी अगर व्यवसाय न देऊन त्यांची फसवणुक केली.

तसेच ते परत येऊ नये यासाठी त्यांना परतीचे खोटे व बनावट विमानाचे तिकीट काढून दिले. तसेच शारजा येथे जाताना त्यांना खोटा बहाणा करुन आरोपी शांतीसिंग घासीसिंग राजपूत, वय २७ वर्षे याचेकडून अंमली पदार्थ प्राप्त करून मोमेंटो (ट्राफी) तसेच केकमधून तो अंमली पदार्थ पाठवून त्याबाबतची माहिती शारजा एअरपोर्ट येथे देवून पिडीत व्यक्तींपैकी क्रिसॅन परेरा व क्लेटन रॉड्रीक्स यांना ड्रग निर्यातच्या खोटया केसमध्ये अडकवून शारजा पोलीसांकडून अटक करवली. तसेच त्यांना नमुद केसमधून सोडविण्याकरीता पिडीत यांचे नातेवाईकांकडे पैशांची खंडणी मागितली होती.

गुन्हयाच्या तपासा दरम्यान असे कळले की, मोनीषा डिमेलो, ही शारजा येथे जाऊन परत आली तिला रवी या आरोपीने केक दिला होता तो तीने मुंबई एअरपोर्ट येथे फेकुन दिला होता. दसरा बळीत क्लेटन रॉड्रीग्स यास रवी याने केक दिला होता त्यास शारजा पोलीसांनी विमानातुन अटक केली. होती. तिसरा बळीत केन रॉड्रीग्स यास काहीही नाव न लिहलेली ट्रॉफी देण्यात आली होती. परंतु त्याने सदरची ट्रॉफी शारजा येथे फेकुन दिली व परत आला. रिषीकेश पंडया यास त्याच्याच

नावाची ट्रॉफी देण्यात आली होती परंतु ती त्याने घेवून जाण्यास नकार दिला व तो शारजा येथे जाऊन परत आला. तसेच क्रिसान परेरा हिस रिषीकेश पंडया नावाची ट्रॉफी देण्यात आली होती व त्यामध्ये अंमली पदार्थ आढळल्याने तिला शारजा येथे अटक करण्यात आली असुन नमुद गुन्हा उघडकिस आणला आहे.

तपासी पथकाने गुन्हयातील बळीत क्रिसान परेरा हिला भारतामध्ये आणण्याकरीता सातत्याने पाठपुरावा करून तेथील न्यायालयात कागदपत्रांची पुर्तता करून दि. ०२/०८/२०२३ रोजी सुखरूप भारतात परत आणण्यात यश आले मिळवले आहे. नमुद गुन्हयाचा तपास पुर्ण करून नमुद गुन्हयात ०३ अटक आरोपीताविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपपत्र मा. अति.मुख्य महानगर दंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट ,मुंबई येथे दिनांक २२/०६/२०२३ रोजी सादर करण्यात आले आहे. कोर्ट केस.क्र ४९४/पीडब्ल्यु/२०२३ असा आहे

कक्ष—१०,गुप्रशा, गुअवि, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | दिपक सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहा. पोलीस निरीक्षक | अफरोज शेख | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा.पोलीस निरीक्षक | धनराज चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा.पोलीस निरीक्षक | गणेश तोडकर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र. ३१८९० | सनिल शेटे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र ३४१६६ | जगदिश धारगळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.९७०५३३ | संतोष धनवडे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.९९०४५४ | रमेश नलावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.०३०९४६ | अविनाश चिकणे | प्रशस्तीपत्रक |
| १० | म.पो.ना ०६१२३६ | सुमन चौगुले | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र.०७.१०२८ | सचिन ठोंबरे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | म.पो.शि ११२१११० | दया खाडे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.चा १५०९२९ | प्रकाश चव्हाण | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २५/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे ऑगस्ट —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट— २०२३

| | | |
|---|---|---|
| **०१** | **ट्रॉम्बे पोलीस ठाणे, परिमंडळ—०६, मुंबई** | **गु.र.क्र.१०७/१८ कलम:—३५४, ३७६ भा.द.वि ४, ६, ८, १० बाल लैंगिक अत्याचार अधि. २०१२** |

**—: " अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात यातील आरोपी आरोपी इंद्रासन गुप्ता, याने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी रेश्मा वय ९ वर्षे ०३ महीने हीच्यासोबत गैरवर्तन करून तिच्या छातीवरून हात फिरवून विनयभंग केला. तसेच तिची चडडी काढून लघवीच्या जागेत हाताचे बोट घातले आणि गैरवर्तन केले. तसेच जबरी संभोग केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती संध्या दगडू इंगळे ३०/वर्षे |
| बळीत | :— | बळीत वय— ०९ वर्षे ०३ महिने |
| निकाल दिनांक | :— | दि. ०५/०८/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | इंद्रासन हिरालाल गुप्ता,वय ४९ वर्षे, **दिनांक २२/०४/२०१८ रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात मा.न्यायालयाने आरोपीतास दोषी ठरवुन १० वर्षे मजुरी व १०,०००/— रू. दंड तसेच दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी अशी शिक्षा सुनावली |

**तपास कौशल्य** :— गुन्हा घडताच तात्काळ दाखल करून घटनास्थळ पंचनामा करून आरोपी इंद्रासन हिरालाल गुप्ता,वय ४९ वर्षे, यास दि. २२/०४/२०१८ रोजी अटक केली. गुन्हयाचा तपास पुर्ण करून तपासी अधिकारी पो.नि. संजय काटे, यांनी दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले. यातील फिर्यादी, बळीत व साक्षीदांराना मा. न्यायालयात साक्षकामी योग्य ते मार्गदर्शन केल्याने अटक आरोपीस मा. न्यायालयाने दोषसिध्द ठरवून शिक्षा दिली.

नमुद गुन्हयात मा.न्यायालयाने आरोपीतास १० वर्षे सक्त मजुरी व १०,०००/— रू. दंड तसेच दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद अशी शिक्षा सुनावली.

**ट्रॉम्बे मैदान पोलीस ठाणे, मुंबई.न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | संजय काटे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | हरिभाऊ बानकर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | अमोल केसकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | प्रकाश सानप | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.९६०४७९ | अजय मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र. ०९१८२७ | संतोष पवार | |